विशेष दिवाणी दावा क्र. १८/२०२३
स्वरा व इतर वि. रामराव व इतर

निशाणी क्रमांक.३८ खाली आदेश

१. सदर अर्ज दि.प्र.सं.१९०८, क्रम ६ नियम १७ अन्वये वादीने दाखल करून नमूद केले टंकलेखनाच्या दोषाने गट क्र.२९७ लिहीण्या ऐवजी गट क्र.९७ असा उल्लेख वाद पत्रात आला आहे. तो दुरूस्त व्हावा म्हणून प्रस्तुत अर्ज आहे. सोबत वादीचे शपथपत्र दाखल आहे.

२. प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यात सदर चुक अनावधानाने झालेली नाही. चुक दुरूस्त झाल्यास प्रतिवादीचे नुकसान होईल. म्हणून अर्ज रद्द करावा.

३. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. दाव्यासोबत दाखल गट क्र.२९७ चा उतारा पाहता आणि दाव्यातील वर्णन पाहता सदरची चुक सदोष टंकलेखनाची आहे. त्यामुळे ते दुरूस्त करण्यास परवानगी देण्यात येते. याअनुषंगाने वादीच्या सरतपासातील झालेली चुक पुढील सरतपासामध्ये दुरूस्त करण्यास परवानगी देण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**

**[एस.एन.सरडे]**

दि.०२/०८/२०२५ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.